## नियमीत दिवाणी मुकदमा क्र.१६०/२०१० मधील निशाणी क्र.९२ वर आदेश
## CNR-MHLA120006952010

१. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. तसेच पक्षकारांतर्फे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. सदरचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० खालील तरतुदीनुसार अजार्त नमूद व्यक्तींना दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणून समाविष्ठ करण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, वादी क्र.१ चे पती दिनकर यांना ४ बहिणी व आई असून त्या हयात आहेत. सदर दावा मिळकतीच्या वाटपाकरीता दाखल असून सदर दाव्यामध्ये मयत दिनकरच्या ४ बहिणी व आई यांना पक्षकार म्हणून समाविष्ठ करणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्जात मागणी केल्याप्रमाणे अर्जात नमूद व्यक्तींना प्रतिवादी म्हणून समाविष्ठ करण्याची वादींनी शेवटी मागणी केलेली आहे. सदर अर्जास प्रतिवादींनी म्हणणे दाखल करून सदरचा दावा अंशतः सुनावणीकरिता असून केवळ प्रकरण लांबविण्याकरिता वादींनी प्रस्तुतचा अर्ज विलंबाने दाखल केलेला आहे, असे कथन केलेले आहे.

३. सदर प्रकरणातील कागदत्रावरून व दोन्ही बाजूंच्या विद्वान वकीलांच्या युक्तीवादावरून याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, सदरचा दावा वादींनी दाव्यात नमूद मिळकतींच्या वाटपाकरीता दाखल केलेला आहे. सदर दव्यामध्ये

वादींनी दावा मिळकती ह्या दिनकरच्या वडिलोपार्जित असल्याचे कथन केलेले आहे. सदर प्रकरणामध्ये प्रतिवादींची कैफियत दाखल झाल्यानंतर प्रकरणामध्ये मुद्दे काढण्यात आलेले आहेत. त्यानंतर सदर प्रकरणामध्ये वादींतर्फे ३ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आलेले आहेत. सदर प्रकरण अंशतः सुनावणीकरीता प्रलंबीत असताना प्रस्तुतचा अर्ज वादींनी दाखल केलेला आहे.

४. तसेच सदर दावा सन २०१० पासून प्रलंबीत असून सदर प्रकरणातील वादी हे दिनकरचे वारस असल्याचे कथन करीत असल्यामुळे वादींना मयत दिनकरला बहिणी व आई असल्याचे दावा दाखल करतेवेळेस माहीत असणार आहे. सदर अर्जामध्ये वादींनी सन २०१० पासून अर्ज दाखल करेपर्यंत अर्जात नमूद व्यक्तींना प्रकरणात समाविष्ठ करण्यासाठी प्रयत्न का केले नाहीत याबाबत कोणताही समाधानकारक खुलासा वादींनी दिलेला नाही. सदरचा दावा मिळकतीच्या वाटपाचा असल्यामुळे अर्जात नमूद व्यक्ती म्हणजेच मयत दिनकर बिरादार यांच्या बहिणी व आई ह्या प्रकरणामध्ये आवश्यक पक्षकार आहेत. परंतु सदर अजार्मुळे व अर्जात नमुद व्यक्तींना प्रकरणामध्ये समाविष्ठ केल्यामुळे प्रकरण आणखी लांबणार आहे. त्यामुळे सदर प्रकरणाचा प्रलंबीत कालावधी, प्रकरणातील पक्षाकारामधील वादाचे स्वरूप, अर्जातील कथन व नैसर्गीक न्यायाचे तत्व विचारात घेउन माझे असे मत झाले आहे की, सदरचा अर्ज वादींवर खर्च बसवून मंजूर केल्यास प्रतिवादींचे जास्ती नुकसान होणार नाही. याउलट सदरचा अर्ज नामंजूर केल्यास प्रकरणामध्ये गुंतागूंत वाढण्याची व वादींची अपरीमीत नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदरचा अर्ज वादींवर खर्च बसवून अर्ज मंजूर

करणे न्यायोचित होणार आहे. सबब मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. नि.क्र.९२ वरील अर्ज वादींवर रक्कम रु.१५००/– खर्च बसवून मंजुर करण्यात येत आहे.

२. वर नमूद खर्चाची रक्कम वादींनी पुढील तारखेपर्यंत प्रकरणातील प्रतिवादींना द्यावे अथवा न्यायालयात जमा करावे.

२. वादींनी अर्जात नमुद केल्याप्रमाणे मुळ दाव्यामध्ये दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत पुढील तारखेपर्यंत प्रकरणात दाखल करावी.

स्वा/–

दि. १५.१२.२०१८. (शि. म. गौरगोंड)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, निलंगा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

Name of the Stenographer : M.N.Yenge
Name of the Court : Jt. C.J.S.D Court
(Shivkant M. Gourgond)
Date of Judgment/Order : 15.12.2018
Judgment/Order signed by presiding officer : 15.12.2018
Judgment/Order uploaded on : 17.12.2018